**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४०००२३,**
**दूरध्वनी - (०२२) २२६६४६३८,२२६७१३३३ फॅक्स् - (०२२) २२६४४६३८**
**संकेतस्थळ** www.dol.maharashtra.gov.in **ईमेल** -director@dol.maharashtra.gov.in

जा.क्र.४/राग्रंसूस/२०१५-१६/६७६३-६८ दि. १४ सप्टेंबर २०१५

**आदेश : -**

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ मधील प्रकरण तीन, कलम ९ पोटकलम (१) व (२) येथे ग्रंथालय संचालकांची कामे निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये कलम २ (फ) येथे **" राज्यात प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्व पुस्तकांची एक ग्रंथसूची, प्रतिवर्षी प्रसिध्द करील "** असे नमूद केलेले आहे.

मुद्रकाकडून **मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७** (Press and Registration Act, 1867) अन्वये राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई व शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे/नागपूर या ठिकाणी ग्रंथ प्राप्त होतात. तसेच, **ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ (Delivery of Book Act, 1954)** अन्वये रामग्रं, मुंबई यांना प्रकाशकांकडून ग्रंथ प्राप्त होत असतात.

तथापि, या बाबत संचालनालयाने या तीनही ग्रंथालयांच्या संयुक्त प्रयत्नांतून तसेच, विविध भाषेतील जाणकार मनुष्यबळ नसल्याने सर्वसाधारणपणे एक मराठी भाषेतील ग्रंथसूची पुढील काळात प्रतिवर्षी छापण्याचा निर्णय घेतला आहे. त्या प्रयोजनार्थ संचालनालयस्तरावर अंतर्गत नियोजनाचा भाग म्हणून खालीलप्रमाणे पदसिध्द स्वरुपाची **'राज्य ग्रंथसूची समिती'** गठित करण्यात येत आहे.

## राज्य ग्रंथसूची समिती

| | | |
|---|---|---|
| १ | ग्रंथालय संचालक,<br>ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | ग्रंथालय उपसंचालक,<br>ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३ | हस्तलिखित अधिकारी,<br>ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ४ | ग्रंथपाल (गट-अ),<br>शासकीय विभागीय ग्रंथालय,पुणे | सदस्य |
| ५ | ग्रंथपाल (गट-अ),<br>शासकीय विभागीय ग्रंथालय,नागपूर | सदस्य |
| ६ | ग्रंथपाल (गट-अ),<br>राज्य मध्यवर्ती ग्रंथालय,मुंबई | सदस्य सचिव |

(किरण गं.धांडोरे)
**ग्रंथालय संचालक**

(कृ.मा.प.)

**प्रत माहितीसाठी सादर - मा.प्रधान सचिव,** उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-५), मंत्रालय, मुंबई

**प्रति,**

ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

ग्रंथालय उपसंचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई

ग्रंथपाल (गट-अ), राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई

ग्रंथपाल (गट-ब), शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे

ग्रंथपाल (गट-ब), शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर

हस्तलिखित अधिकारी, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई